सकाळ दि 19/03/2023

# जबरी चोरी करणाऱ्या चार आरोपींना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड, ता. १८ (बातमीदार)** : जबरी चोरी करणाऱ्या चार आरोपींना मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडील चोरलेला १९ हजाराचा मोबाईल व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपींकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या आदेशानुसार वेगवेगळ्या गुन्ह्यातील आरोपींना शोधण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी पथके गठित करून शोध सुरू केला होता. दरम्यान, नांदेडला तरोड्यातील भावसार चौकात जबरी चोरी करणारे चार आरोपी थांबल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने सापळा रचून मुकेश शिवाजी कदम (वय १९, रा. भावसार चौक), आशिष मुरलीधर शिंपाळे (वय २१, रा. अंकुरनगर), किशोर सत्यप्रकाश माळगे (वय १९, रा. विशालनगर) आणि हरिष ओमप्रकाश धोंगडे (वय २१, रा. फरांदेनगर, नांदेड) या चौघांना पकडून विचारपूस केली. त्यांनी विमानतळ पोलिस ठाण्यातंर्गत चोरी केल्याचे कबूल केले असून चोरीतील मोबाईल व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलिस अधीक्षक कोकाटे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार, खंडेराव धरणे, पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार दत्तात्रय काळे, पोलिस जमादार सखाराम नवघरे, विठ्ठल शेळके, विलास कदम, गणेश धुमाळ, महेश बडगू, गजानन बयनवाड, शंकर केंद्रे यांनी सदर कारवाई पार पाडली आहे.